**नियमीत दिवाणी दावा क्रमांक १९९/१९९५**
**लक्ष्मण वि. रंगनाथ, वगैरे**

MHAH080001452014

## निशाणी क्र.२५६ वरील आदेश

वादीने प्रतिवादी क्र. २ चे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला उशिर माफ होवुन मिळणेसाठी सदरहु अर्ज केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ गोपीनाथ रभाजी वाघ हा दिनांक ०५.०५. २०२१ रोजी मयत झालेला आहे. परंतु वादी वयोवृध्द् असल्याने त्यांची तब्येत बरी नव्हती. तसेच कोव्हीडची दुसरी तिसरी लाट होती त्यामुळे वादी कोर्टात येवु शकला नाही. तसेच मयताचा मृत्युचा दाखलाहि मिळाला नाही. जुन २०२२ मध्ये वादीस मृत्युचा दाखला मिळाला. त्यामुळे त्यांना वारस रेकॉर्डवर घेणेकामी उशिर झालेला आहे. त्याने जाणीवपूर्वक उशिर केलेला नाही. प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला उशिर माफ होवुन त्यांचे कायदेशीर हयात वारस रेकॉर्डवर येणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांचे विधिज्ञांनी म्हणणे देवुन आक्षेप नोंदवला. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तिक नाही. अर्ज खरा व कायदेशीर नाही. वादी व प्रतिवादी हे एकाच कुंटूबातील असुन त्यांनी जाणुनबुजूत उशीर केला आहे. वैकल्पीकरित्या अर्ज मंजुर करावा असे कोर्टाचे मत झाल्यास जास्तीत जास्त कॉस्टचा हुकूम व्हावा. वादीचे अर्जास बारा महिन्यापेक्षा जास्त उशीर झाला आहे. सबब वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वाटपासाठी व निरंतर मनाई हुकूमासाठी केला आहे. अशा दाव्याकरिता सर्व पक्षकारांचा समावेश दाव्याकामी असणे दाव्याच्या अंतिम निकालाकरिता आवश्यक आहे. सबब वादीविरूध्द पारीत करण्यात अबेटमेंट सेट असाईडचा हुकुम रदद् बातल करणे न्यायोचित होईल. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादीच्या म्हणन्याचे अवलोकन केले असता असु दिसुन येते कि, वादी व प्रतिवादी हे एकाच कुंटूबातील आहेत. वादीने अर्जास दिलेल कारण संयुक्तिक वाटत नाही. सबब सदर वादीवर रक्कम रू. ५००/- लादुन प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परिणामी खालील आदेश

:-

## <u>आदेश</u>

१. सदरहु अर्ज निशाणी क्र.२५६ मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ गोपीनाथ रभाजी वाघ यांच्या वारसांची नावे अभिलेखी घेण्यास झालेला झालेला उशिर हा वादीने रक्कम रूपये ५००/- (अक्षरी रूपये पाचशे मात्र) पुढील तारखेपर्यंत तालुका विधी सेवा प्राधिकरण, संगमनेर येथे जमा करण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

Mohinee Janu Gaikwad
Digitally signed by Mohinee Janu Gaikwad
Date: 2023.08.02 10:38:08 +0000

(एम.जे.गायकवाड)
दिनांक ०२.०८.२०२३
५ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
संगमनेर